(14)

श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय,खडकी,अकोला येथील सहाय्यक प्राध्यापकांची ७ पदे भरण्यास मान्यता देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय : क्र.सकाम २०१८/प्र.क्र.१६०/सामासू
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-३२
दिनांक: १९ सप्टेंबर,२०१८

वाचा : १) शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२ जून,२०१५.
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.६४/२०१५ वित्तीय सुधारणा-१, दि.१५ जानेवारी, २०१६.
३) प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण विभाग,अमरावती यांचे पत्र क्र.प्राउपा/ सकवि/अम/सकाम/पद मंजूरी/२४२७/२०१८-१९,दि.१७.०५.२०१८

**प्रस्तावना** : प्राचार्य, श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय,खडकी, अकोला यांनी दि.१२.०४.२०१८ च्या पत्रान्वये १४ सहायक प्राध्यापक व १ प्राचार्य अशी एकूण १५ पदे भरण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दि.०२.०२.१९९९ अन्वये समाजकार्य चालविणा-या शाळा/संस्थांना मान्यता व अनुदान देण्याबाबतची संबंधीत नियमावली मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय दि.०१.०९.२००५ अन्वये समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे.

सदर महाविदयालयाची प्रथम वर्षाची प्रवेश क्षमता ८० विद्यार्थी ठरविण्यात आली आहे. त्यानुसार श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालयातील मागील तीन वर्षातील प्रवेशित विद्यार्थी संख्या एकूण १०४० आहे. दि.०१.०९.२००५ च्या शासन निर्णयानुसार १४:१ याप्रमाणे २४:७६ म्हणजेच अधिव्याख्याताची २५ पदे व प्राचार्य १ पद अशी एकूण २६ पदे अनुज्ञेय आहेत. तथापि सदर पदांपैकी प्रत्यक्षात ११ अधिव्याख्यातांची पदे भरलेली आहेत. प्रवेशित विद्यार्थी संख्येचा विचार करता सहायक प्राध्यापक १४ पदे व प्राचार्य १ पद अशी एकूण १५ पदे मान्यतेसाठी प्रस्तावित आहेत.

College Code- 225

Attested

प्राचार्य,
श्रीमती पंचफुलादेवी पाटील

Assistant Commissioner
Social Welfare, AKOLA.

सदर पदे पदभरतीवरील निर्बंधाबाबत वित्त विभागाने निर्गमित केलेल्या दि.०२ जून,२०१५ व दि.१५ जानेवारी,२०१६ अन्वये सरळसेवेच्या रिक्त पदाच्या ५० टक्के पदे भरण्याचे निदेश दिले आहेत. त्यानुषंगाने श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला या महाविद्यालयातील समाजकार्य महाविद्यालयास एकूण ०७ पदे भरण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला या समाजकार्य महाविद्यालयास सहाय्यक प्राध्यापकाची एकूण ०७ रिक्त पदे भरण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

सदर पदे भरण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) वित्त विभागाचा शासन निर्णय दि.०२ जून,२०१५ व दि.१५ जानेवारी २०१६ मधील तरतुदीचे पालन करावे.
२) बिंदूनामावली जातनिहाय आरक्षणाची अंमलबजावणी करावी.
३) पारदर्शक भरतीप्रक्रीयेचे पालन झाले किंवा कसे याबाबतचे काटेकोरपणे तपासणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने .

(सिध्दार्थ अ.झाल्टे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त,समाजकल्याण,पुणे
२) महालेखापाल लेखा व अनुज्ञेयता,महाराष्ट्र १, मुंबई/नागपूर
३) महालेखापाल लेखा व परिक्षा,महाराष्ट्र १, मुंबई/नागपूर
४) अधिदान व लेखाधिकारी,मुंबई
५) प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण,अमरावती
६) सहायक आयुक्त,समाजकल्याण,अकोला
७) जिल्हा कोषागार अधिकारी,अकोला
८) अवर सचिव अर्थसंकल्प,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
९) प्राचार्य,श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय,खडकी, अकोला
१०) निवडनस्ती,सामासु